दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.२२ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २३६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 22 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 236 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

# जगाचा पोशिंदा अपमानित

## आपण जनतेचे सेवक आहेत हेच मॅडम विसरून गेल्या!

## केज गटविकास अधिकाऱ्यांच्या अरेरावीने संतप्त शेतकरी आमरण उपोषणाच्या तयारीत!

## परिवार, जनावरानसकट बसणार आमरण उपोषणास



### बॉसगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का?

गावोगावच्या गरीब शेतकऱ्यांना सरकारच्या योजनांचा लाभ मिळावा यासाठी अधिकारी वर्ग जबाबदार आहे. मात्र, काही अधिकारी सत्तेचा गैरवापर करून जनतेला दडपून टाकतात. मी बॉस आहे अशी अहंकारी भाषा वापरणाऱ्या दिवाने मॅडमसारख्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचा मानसिक छळ करणे हे निंदनीय आहे. प्रशासनात अशा अरेरावी करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई व्हावी, अशी मागणी आता शेतकरी संघटनांनी सुरू केली आहे.

### पंचायत समितीत चालतोय भोंगळ कारभार?

केज पंचायत समितीमध्ये शेततळे, नळ योजना, शौचालय योजनेच्या फायली मंजूर करण्यासाठी शेतकऱ्यांना खेटे मारावे लागत आहेत. तक्रारी नोंदवल्यावरही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याची वारंवारता आहे. जनतेसाठी असलेली योजना ही 'कमिशन'च्या अडचणीत न अडकता थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवली गेली पाहिजे. जनतेचा सवाल कारवाई कधी?,केज गटविकास अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का?,पंचायत समितीतील भ्रष्टाचाराला लगाम लागणार का?,गरीब शेतकऱ्यांच्या भावनांची व कष्टाची किंमत कोण देणार,या साऱ्या प्रश्नांची उत्तरं केवळ प्रशासनाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या अधिकाऱ्यांकडे आहे. शेतकरी हा देशाचा पोशिंदा आहे, त्याचा अपमान झाला तर तो सहन केला जाणार नाही, हे लक्षात ठेवावे लागेल.

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील देवगाव येथील शेतकरी कैलास मुंडे यांना तालुक्यातील गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने मॅडम यांनी केलेली अवमानकारक वागणूक सध्या चांगलीच गाजत असून, या घटनेने संपूर्ण शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे. अन्यायकारक व अपमानजनक वागणुकीने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आता थेट आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.



### अश्लाघ्य भाषा व अरेरावीचा अनुभव

शेतकरी कैलास मुंडे यांनी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत अम्म्रतकुंड शेततळे योजना मंजूर व्हावी यासाठी फाईल दोन महिन्यांपूर्वीच सादर केली होती. सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही फाईल मंजुरीसाठी थांबलेली आहे. गटविकास अधिकाऱ्यांना भेटून विचारणा केली असता, मजुऱ्या संपल्या अशी पुस्ती जोडत त्यांची फाईल डावलण्यात आली. जेव्हा मुंडे यांनी आपल्या हक्काबद्दल बोलले, तेव्हा गटविकास अधिकारी दिवाने मॅडम म्हणाल्या, मी इथली बॉस आहे. तुझं काम फुकट होत नाही, काही करायचं असेल तर कर! अशी थेट धमकीवजा भाषा वापरून एका शेतकऱ्याचा अपमान केला.

### शेती आणि जनावरांच्या जिवावर बेतणारी परिस्थिती

कैलास मुंडे यांची २ एकर डाळिंब बाग, २.५ एकर जांभूळ बाग, तसेच १५ जनावरे आहेत. वेळेवर पाणी मिळाले नाही तर त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होणार आहे. या पाश्वभूमीवर त्यांनी २१ जुलै रोजी बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली असून, जर दि. २८ जुलै पर्यंत निर्णय झाला नाही, तर परिवारासह व जनावरांना घेऊन पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

## नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष अमर पाटील यांचा सर्वपक्षीय सत्कार

**केज । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या केज तालुकाध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती झालेले तरुणांचे लाडके नेते अमर (भैया) पाटील यांचा सर्वपक्षीय मित्रपरिवाराच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्यात उपनगराध्यक्ष पशुपती दांगट, माजी नगराध्यक्ष कबीर (भाई) इनामदार, माजी उपनगराध्यक्ष दलित (भाई) इनामदार, नगरसेविका अरुणा गुंड, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब ठोंबरे, सरपंच मुकुंद (मामा) कणसे, भाजपचे समीर देशपांडे, माजी नगरसेवक कपिल मस्के, पत्रकार विनोद शिंदे, माजी ग्रामपंचायत सदस्य मुज्जू खुरेशी, दिनकर पवार सर, मुन्ना ठोंबरे आदी मान्यवर उपस्थित होते.



अमर पाटील यांनी सर्वसामान्य जनतेच्या आणि आठरापगड जातीच्या हितासाठी सातत्याने कार्य केले असून, त्यांच्या नेतृत्वामुळे तालुक्याला नवे दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी सर्वांनी व्यक्त केला. या वेळी सत्कारप्रसंगी प्रतिक्रिया व्यक्त करताना अमर (भैया) पाटील म्हणाले, तालुकाध्यक्षपद ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानासोबतच कामगिरीचीही संधी आहे. मी आजपर्यंत सर्वसामान्य जनतेसाठी आणि तरुणांसाठी काम केले असून, यापुढेही कोणताही भेद न करता सर्व जाती-धर्माच्या जनतेसाठी पारदर्शक व विकासाभिमुख काम करणार आहे. पक्षाचे नेते खा. सुनिल तटकरे साहेब, आ. धनंजय मुंडे साहेब यांनी दाखवलेला विश्वास मी कृतिशील कामगिरीने सार्थ ठरवेन. राजकारण हे प्रतिष्ठेचे नव्हे तर जनसेवेचे माध्यम आहे, हे मी कधीही विसरणार नाही.

## छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना बाजार कोतवाली वेस पर्यंत रस्त्याचा काम तात्काळ सुरू करा

### अन्यथा १४ ऑगस्टपासून बेमुदत धरणे आंदोलन-अमरजान पठाण

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस,कारंजा रोड,बलभीम चौक,जुना बाजार ते कोतवाली वेस पर्यंतच्या रस्त्याचा काम तात्काळ सुरू करण्यात यावा अन्यथा येत्या १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता बीड नगरपरिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी आज दिला.

पठाण यांनी दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, बीड शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा रोड, बलभीम चौक, जुना बाजार ते कोतवाली वेस पर्यंतचा हा रस्ता



नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून सध्या याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खोल खड्डे पडले असून, पावसामुळे ते जलमय झाले आहेत. त्यामुळे वाहतुकीस अडथळा तर निर्माण झालाच आहे, शिवाय कोणताही जीवघेणा अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.हा रस्ता शहरातील प्रमुख व्यापारी मार्ग असून, दररोज जिल्हाभरातून व्यापारी व नागरिक या भागात ये - जा करतात. रस्त्याची ही अवस्था नागरिकांच्या संयमाचा अंत पाहणारी ठरत आहे.मनसेने प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर तात्काळ रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली नाही,तर १४ ऑगस्ट गुरुवार रोजी सकाळी ११:०० वाजल्या पासून बीड नगर परिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल असे बीड नगरपरिषद कार्यालय, कार्यकारीअभियंता बीड,व जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

## श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे दि २५ जुलै पासुन रामायण आयोध्याकांड ग्रंथ सुरू

**बीड । प्रतिनिधी**

दि.२५जुलै शुक्रवार पासून रोज श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान(मंदिर) इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बालेपीर बीड येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी भाऊ -बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप आयोजित.राष्ट्रसंत गुरूवर्य.वै.श्रीसंत. भगवानबाबा यांच्या जयंती निमित्त वर्षं १८वे निमित्त यावर्षीदि२५/७/२०२५ शुक्रवार ते १३/८/२०२५बुधवार या कालावध भावार्थ रामायण आयोध्याकांडयाग्रंथाचे रोज रात्री ८ते१०यावेळेत कथाभाग (पोथी) सुरू होणार आहे.या कथेचे सुचक ह.भ. प.कचरू.महाराज चव्हाण व ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे व वाचक ह.भ.प.उतम महाराज दोडके,ह.भ.प. दतायत्र.महाराज बांगरसर हे राहतील तरी या ग्रंथाचा कथेच्या श्रवणाचा लाभ परिसरातील सर्व भाविक-भक्तांनी घ्यावा असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक व श्रीसंत भाऊ -बाबा प्रतिष्ठान बीडचेअध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप व त्यांच्या सर्व सहकारी यांनी व परिसरातील भाविक भक्त यांनी केले आहे.

## जेष्ठ नागरिक संघ केजच्या वतीने सुगम संगीता सह अन्य कार्यक्रमाचे आयोजन

**केज । प्रतिनिधी**

केज जेष्ठ नागरिक संघाची सभा केज शाखेचे अध्यक्ष श्री. राजेसाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली कालिका मंदिर शुक्रवार पेठ केज येथे पार पडली.या सभेच्या वेळी आंबेजोगाई येथील प्राध्यापक प्रसाद कुलकर्णी यांच्या संगीत विद्यालयाच्या वतीने सुगम संगीताचा कार्यक्रम सादर करण्यात आला.यावेळी बीड जिल्हा समन्वयक श्री.मामडगे जे.डी आणि दक्षिण विभागाचे अध्यक्ष प्राचार्य श्री. थोरात सर यांनी उपस्थित सर्व ज्येष्ठांना जेष्ठ नागरी संघाचे महत्व आणि त्याचे फायदे समजावुन सांगितले.याचवेळी ज्येष्ठ नागरिक संघ केज शाखेतील ज्यांचा वाढदिवस जुलै महिन्यात आहे अशांचा वाढदिवसही साजरा करण्यात आला. अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाची सुरुची भोजनानंतर सांगता झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघाचे सदस्य श्री.हनुमंत घाडगे यांनी केले तर संघाचे सहसचिव श्री. साखरे डी.एस यांनी उपस्थितांचे आभार मानले.



संपादकीय

# एसटीची सुधारणा करताना प्रवासी केंद्रस्थानी असावा



गाव तेथे रस्ता आणि रस्ता तेथे एसटी धावायला हवी, असे गेल्या अनेक दशकांपासून राज्याच्या दुर्गम भागात राहणाऱ्या गावकऱ्यांचे स्वप्न असते. राज्यातील सर्वसामान्यांना परवडणारी एसटीची सेवा आज शहरापासून ग्रामीण भागापर्यंत अव्याहतपणे सुरू आहे. पण, काळाच्या या चक्रात एसटी महामंडळाला आर्थिक विंवचनेतून जावे लागले. 'प्रवाशांच्या सेवेत' हे एसटीच ब्रीदवाक्य आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतील प्रत्येकाला प्रवासाचा आधार म्हणजे आपली लालपरी वाटते. संकटकाळात एसटी अशी कशी उपयोगी पडते याचा प्रत्यय मुंबईकरांनाही आला होता. कोरोना काळात मुंबईतील लोकल बंद करण्याचा निर्णय झाला. त्यावेळी बेस्ट बसेसच्या जोडीला एसटी महामंडळाच्या गाड्या या मुंबईतील गल्लीबोळातून धावत होत्या. औरंगाबाद, जळगावमधील वाहनचालक हे आपले गाव सोडून मुंबईकरांच्या सेवेत होते. त्यामुळे मुंबईकरांना कोरोना काळात नोकरीवर जाण्यासाठी एसटी बसेसचा उपयोग झाला होता, याची जाणीव मुंबईकरांना आहे; परंतु हीच सेवा देणारी एसटी अडचणीत का आहे, हे जाणून घेण्याची उत्सुकता मुंबईसारख्या शहरामध्ये राहणाऱ्या नागरिकांनासुद्धा आहे.एसटी महामंडळाची आर्थिक सद्यस्थिती दर्शवणारी एक श्वेतपत्रिका सोमवारी जाहीर झाली. एसटीचे एकूण महसुली उत्पन्न, खर्च, कर्ज आणि देयके किती आहेत? याबाबतचा आढावा घेणारी ती श्वेतपत्रिका होती. या श्वेतपत्रिकेत ४५ वर्षांचे अवलोकन करण्यात आले आहे. या ४५ वर्षांपैकी फक्त ८ वर्षेच महामंडळाला काही प्रमाणात नफा झाल्याचे दिसून आले आहे. उर्वरित सर्व वर्षात मोठ्या प्रमाणात तोटा झाल्याचे समोर आले आहे, त्यामुळे हा तोटा का झाला? यावर उपाययोजना काय आहे, याबाबत श्वेतपत्रिकेत नमूद केले आहे. एसटी महामंडळाने पुढील वाटचालीसाठी काही महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविलेल्या आहेत. अपघात कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. प्रवासी व मालमत्तांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही प्रणाली बसवली जाणार आहे. सध्या सवलत नसलेल्या लांब पल्ल्याच्या प्रवाशांसाठी भाड्यात सवलत देण्याचा विचार आहे. तसेच कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबवण्याची योजना देखील आहे. त्याचप्रमाणे, एसटी महामंडळाच्या ताफ्यात दरवर्षी ५ हजार नवीन बसेसचा समावेश करणे, एसटी ताफ्यात भाडेतत्त्वावरील हायटेक व्होल्वो बसेसचा समावेश करणे, एसटी महामंडळाच्या जागांवर इंधन पुरवठादार कंपन्याकडून महसुली भागीदारी तत्त्वावर खासगी वाहनांसाठी किरकोळ इंधन विक्री केंद्र सुरू करणे, एसटी महामंडळाच्या जागांचा बिओटी/पीपीपी तत्त्वावर विकास करणे, प्रवासी सोयी आणि सुविधा निर्माण करणे, उत्पन्न वाढीसाठी लक्षांक निश्चित करणे, आदी उपाययोजनांचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे, एसटी महामंडळाने तोट्याची पाच महत्त्वाची कारणे या श्वेतपत्रिकेत सांगितली आहेत. त्यात, राज्य परिवहन महामंडळाकडे बसेसची कमतरता असल्याचा मुद्दा नमूद केला आहे. उपलब्ध असलेल्या बसेसचे आयुर्मान अधिक असणे आवश्यक आहे. अनिवार्य व तोट्यातील चलन, अनियमित भाडेवाढ, अवैध वाहतूक ही एसटी तोट्यात जाण्यास कारणीभूत ठरली आहे. श्वेतपत्रिकेनुसार, महसूल वाढीच्या काही उपाययोजनांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामध्ये उच्च दर्जाच्या व्होल्वो बस भाडेतत्त्वावर घेतल्या जाणार आहेत. महामंडळाच्या मालकीच्या जागांवर खासगी वाहनांसाठी इंधन पंप उभारण्यात येणार असून, त्यासाठी इंधन पुरवठादारांशी महसूल वाटप करार केले जाणार आहेत. तसेच, महामंडळाच्या मालमत्ता बीओटी किंवा पीपीपी मॉडेलवर विकसित केल्या जाणार आहेत. सी–कॅटेगरी मार्गांचे बी–कॅटेगरीत व बी–कॅटेगरीचे ए–कॅटेगरीत रूपांतर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्रवासी सुविधांचा दर्जा उंचावणे आणि महसूल वाढीसाठी ठोस उद्दिष्टे निश्चित केली जाणार आहेत.एसटी महामंडळाकडे पूर्वी कामगार वर्ग मोठा होता. मात्र आता कामगार वर्ग ७९ हजार आहे. आधी १८ हजार ५०० गाड्या होत्या. पण नंतर काही बसगाड्या मोडकळीस आल्या. गळक्या आणि तुटक्या बसेस रस्त्यावर चालत होत्या. गेल्या १० ते १२ वर्षांत हा ग्राफ कमी होत गेला आहे. नवीन बसेस घेतल्या नाहीत. ३ ते ४ वर्षांपूर्वी जर नवीन बसेस घेतल्या असत्या तर तोटा जास्त झाला नसता, याची कबुली परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. महामंडळाचा तोटा सुमारे १० हजारांपेक्षा अधिक आहे. तो भरून काढणे कठीण आहे. त्याचे कारण २५ ते ३० हजार बसेस आहेत, त्याच्या जीवावर तोटा भरून काढणार का? हा प्रश्न आहे. ७७ वर्षांचा एसटी महामंडळाचा इतिहास आहे. गेल्या १० ते १५ वर्षांत हळूहळू ग्राफ कमी होत गेल्याचे दिसत आहे. त्यासाठी दर वर्षाला ५ हजार बसेस ताफ्यात आवश्यक आहेत. जेणेकरून एसटी महामंडळ नफ्यात राहील. पुढच्या ३ ते ४ वर्षांत एसटी तोट्यात राहणार नाही, असा विश्वास श्वेतपत्रिकेतून व्यक्त करण्यात आला आहे, ही समाधानाची बाब आहे. मात्र, एसटी महामंडळाला फायद्यात आणताना, मोक्याच्या ठिकाणी असलेले एसटी डेपो हे महामंडळाच्या ताब्यात असावेत. ते खासगी कंपन्यांच्या ताब्यात जाऊ नयेत, ही प्रवाशांची भावना आहे. डेपोची जागा ही खासगी मालकांच्या ताब्यात गेली तर, प्रवासी हे हळूहळू लालपरीपासून पोरके होण्यास सुरुवात होईल. त्यामुळे ग्रामीण भागातील एसटीचे डेपो हे आजूबाजूच्या परिसराचा विकास होण्यास कारणीभूत ठरले होते. एसटीच्या मालमत्तेची ओळख भविष्यात कायम असावी, ही एसटी प्रवाशांची माफक अपेक्षा आहे. ती पूर्ण करण्यात सरकारलाही काही अडचण नसावी.

# हवाई सुरक्षेसाठी सतर्कता




हवाई वाहतूक सुरक्षा हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. खोट्या 'बॉम्ब स्फोटाच्या' धमक्या ह्या देशातील विमानसेवा विस्कळित करण्याचे आणि सेवा प्रदाते आणि प्रवासी या दोघांवरही प्रचंड मानसिक दबाव निर्माण करण्याचे एक साधन आहे. आपल्याला आठवत असेल की नोव्हेंबर २०२४ मध्ये विविध भारतीय विमान कंपन्यांच्या ३०० हून अधिक विमान उड्डाणांना खोट्या बॉम्बस्फोटाच्या धमक्या मिळाल्या होत्या. त्यामुळे भारताचे विमान वाहतूक क्षेत्र नुसतेच अस्थिर आणि विचलित झाले नव्हते, तर अनिश्चितता आणि आर्थिक तणावानेही ग्रासले होते. भारत सरकारने उपाययोजना केल्यानंतर त्यावर बरचसे नियंत्रण आले होते. परंतु, या प्रकाराला २०२५ मध्ये पुन्हा सुरुवात झाली आहे. मार्च महिन्यापर्यंत ११ भारतीय विमानांना अशा धमक्या मिळाल्या होत्या. जून महिन्यात एअर इंडिया व इंडिगो उड्डाणांना व बंगळुरू विमानतळाला बॉम्ब स्फोटाच्या धमक्या मिळाल्या आहेत. अशा खोट्या धमक्यांचे हवाई क्षेत्र, त्याची सुरक्षितता व प्रवाशांच्या मानसिकतेवर गंभीर परिणाम होऊ शकतात.

परिणामतः हवाई क्षेत्रात प्रचंड अराजकता निर्माण होऊ नये व हवाई वाहतूक क्षेत्राची विश्वासार्हता ढासळू नये म्हणून अशा धमक्यांवर प्रतिबंधात्मक (डिटरंट) उपाययोजना करण्याची अत्यंत गरज आहे. अशा उपाययोजना बहुविध/बहुआयामी असाव्या लागतील आणि त्यासाठी वैयक्तिक प्रवासी आणि प्रवासी गट, एअरलाइन्स, विमानतळ व्यवस्थापन, विमानतळ सुरक्षा कर्मचारी, ब्यूरो ऑफ सिव्हिल एव्हिएशन सेफ्टी (बीसीएएस किंवा बीकॅस), राज्य आणि केंद्र सरकार या सगळ्यांचे योगदान लागेल, याबाबत दुमत असू नये. पुढील विश्लेषण त्या संदर्भात आहे.

वैयक्तिक प्रवासी आणि प्रवासी गट : विमान वाहतूक क्षेत्राला पुरेशी सुरक्षा पुरविण्याची जबाबदारी पूर्णपणे सरकारची आहे. मात्र, प्रत्येक परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सरकारकडे अमर्याद संसाधने नसल्याने सरकारच्या कामाला मर्यादा असतात. नागरिकांनी या मर्यादा ओळखून हवाई सुरक्षेसाठी हातभार लावण्याची तयारी ठेवली पाहिजे. वैयक्तिक प्रवासी आणि गटांनी डिजिटल माध्यमांवरील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे आणि त्वरित त्याची माहिती संबधित यंत्रणांना देणे आवश्यक आहे. विमानतळावर प्रवाशांनी लोकांच्या संशयास्पद हालचाली किंवा विचित्र वागणुकीबाबत सतर्क राहणे आवश्यक आहे आणि दिसल्यास त्याची माहिती देणेही आवश्यक आहे. प्रवाशांनी सामानात निषिद्ध वस्तू न नेणे व सुरक्षा कर्मचाऱ्यांशी वाद टाळणे महत्त्वाचे आहे, कारण यामुळे कामाचा ताण वाढतो.

एअरलाइन्स : विमान कंपन्यांनी भरतीपूर्वी त्यांच्या कर्मचाऱ्यांची कसून तपासणी करणे आवश्यक आहे कारण प्रतिबंध नेहमीच उपचारांपेक्षा चांगले असतात. नियमित सुरक्षा तपासणीही केली पाहिजे. त्यांनी प्रवाशांना प्रचलित सामानाचे नियम व निर्बंधांबाबत स्पष्ट सूचना द्याव्यात. चेक–इन कर्मचाऱ्यांना प्रवाशांच्या कोणत्याही संशयास्पद हालचाली किंवा विचित्र वागणूक पाहण्याचे प्रशिक्षण द्यावे. विमान कंपन्यांनी उड्डाणापूर्वी सामानाची तसेच विमानांची कसून तपासणी करण्याची यंत्रणा उभारणेही गरजेचे आहे; जेणेकरून उड्डाणादरम्यानचा धोका टाळता येईल. केबिन क्रूने प्रवाशांच्या संशयास्पद वागणुकीवर लक्ष ठेवावे आणि गरज भासल्यास त्वरित उपाययोजना सुरू कराव्यात. विमान कंपन्यांनी हवाई बाजूने काम करणारे कर्मचारी, तसेच जेवण, इंधन, कचरावहन यांसारख्या सेवा पुरविणाऱ्या बाह्य एजन्सींबाबतही सतर्क राहणे आवश्यक आहे

विमानतळ व्यवस्थापन : विमानतळावरील कर्मचाऱ्यांची भरतीपूर्व कसून तपासणी करण्यात यावी, तसेच नियमित सुरक्षा तपासणी करण्यात यावी. प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या मार्गांवर नियंत्रण ठेवावे आणि अनधिकृत प्रवेशाला वाव ठेवू नये. पॅसेंजर साइड आणि एअरसाइड या दोन्ही बाजूंना पुरेशी सीसीटीव्ही देखरेख ठेवावी. डिजी–यात्रा सॉफ्टवेअर कधीकधी अपयशी ठरले आहे आणि विमानतळात अनधिकृत प्रवेश दिला गेला आहे; ही उणीव प्राधान्याने दूर करण्याची गरज आहे. सुरक्षेतील तपासणी प्रक्रियेला गती देण्यासाठी विमानतळावर आधुनिक बॅगेज स्कॅनर आणि केबिन बॅगेज स्कॅनर आणि फुल बॉडी स्कॅनरसारखी प्रभावी हाय स्पीड साधने असणे आवश्यक आहे. विमानतळ व्यवस्थापनाने हे लक्षात ठेवले पाहिजे, की भ्रष्टाचार हा सुरक्षिततेसाठी मोठा शाप आहे आणि स्वतःच्या कर्मचाऱ्यां बद्दल सतर्क असणे आवश्यक आहे.

विमानतळ सुरक्षा कर्मचारी: एजन्सीने स्वत:च्या कर्मचाऱ्यांची कसून तपासणी केली पाहिजे. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे व कोणतीही धोकादायक परिस्थिती हाताळण्यासाठी सुसज्ज असणे महत्त्वाचे आहे. पुरेसे तपासश्वानांचे बळ सुरक्षा वाढविण्यास मदत करील. गाफीलपणा टाळण्यासाठी सुरक्षा कर्मचाऱ्यांवर जास्त कामाचा ताण येणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे.


बीकॅस : बीकॅस नागरी हवाई वाहतूक सुरक्षिततेसाठी एक छत्र प्रदान करते. बीकॅसने सचोटीसाठी स्वतःच्या कर्मचाऱ्यांची तपासणी केली पाहिजे. विमान वाहतुकीच्या सुरक्षेच्या विस्तृत गरजा पूर्ण करण्यासाठी बीकॅसमध्ये बहुआयामी कर्मचारी असणे आवश्यक आहे. उदयोन्मुख धोके आणि तंत्रज्ञानाची पूर्ण जाणीव नेहमीच ठेवणे आणि आपली धोरणे व पायाभूत सुविधा नियमितपणे अद्ययावत करणे आवश्यक आहे.

राज्य आणि केंद्र सरकार: नागरी हवाई वाहतूक सुरक्षेत सरकार मोठा भागीदार आहे. विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी विभागांमध्ये कुशल सुरक्षा आणि बहुआयामी कर्मचारी असणे आवश्यक आहे. इतर भागधारकांना संभाव्य धोक्याची सूचना देणे, सुरक्षा उपाययोजना वाढविण्याचे आदेश देणे, पायाभूत सुविधांच्या अद्ययावतीकरणासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. वास्तविक परिस्थिती आणि समस्या समजून घेण्यासाठी विभागीय कर्मचाऱ्यांना नियमितपणे ग्राउंड लेव्हलवर तैनात करणे व आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्याचे प्रशिक्षण देणे महत्त्वाचे आहे. सरकारने विमानतळ, विमान कंपन्यांची नियमित तपासणी करून त्यातील त्रुटी गांभीर्याने दूर करायला हव्यात. तसेच बेकायदा घटकांचा सामना करण्यासाठी कडक कायदे तयार करावेत. विमान वाहतूक किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका असल्यास सोशल मीडिया सेवा पुरवठादारांना संदेशांचे स्रोत उघड करण्यास भाग पाडण्यासाठी कायदे करावेत. ज्या ईमेल स्रोतांकडून सुरक्षा उल्लंघनाचे संदेश प्राप्त होतात, त्यांचा शोध घेण्यासाठी सरकारने आपली डिजिटल देखरेख क्षमता सातत्याने अद्ययावत करणे आवश्यक आहे. इंटेलिजन्स इन्फ्रास्ट्रक्चर कितीही आधुनिक असले तरी कम्युनिकेशन इंटेलिजन्स नष्ट करू नये, हेही लक्षात घ्यायला हवे. सात ऑक्टोबर २०२३ ला इस्रायलवर हमासने केलेला हल्ला हा धडा सर्वांनी लक्षात ठेवला पाहिजे. कधी कधी अशा धमक्या परदेशातून किंवा परदेशी संघटनांकडून येऊ शकतात. अशा वेळी सरकारला परदेश–व्यवहार मंत्रालयाचा किंवा संबंधित देशाच्या दूतावासाचा उपयोग करावा लागू शकतो. सरकारने व्हीआयपी संस्कृती देखील काढून टाकली पाहिजे, ती स्टेटस सिम्बॉलऐवजी अस्सल गरजांवर आधारित असावी.कोणतीही यंत्रणा फुलप्रूफ नसते हेही लक्षात घेणे गरजेचे आहे. सुरक्षेचे उपाय अधिक कडक करण्यात आल्याने 'अनैतिक घटक' सुरक्षा नियम उधळून लावण्यासाठी नव–नवीन मार्ग शोधतील, हे विसरू नये. आपली अनपेक्षित धोके हाताळण्यासाठी सतर्कता आणि त्वरित प्रतिक्रिया क्षमता हीच प्रभावी सुरक्षेची गुरुकिल्ली ठरेल. त्यासाठी थॉमस जेफरसन यांनी म्हटल्याप्रमाणे. 'आपला सतर्कतेचा डोळा कधीही बंद होऊ देऊ नये.'

# हुंडाबळी एक लज्जास्पद विकृती...

मुलींकडून हुंडा का मागितला जातो? याची मानसशास्त्रीय कारणे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. लोभ आणि अतृप्त गरजा असणारे कुटुंब. काही व्यक्ती आणि कुटुंबांमध्ये लोभ आणि भौतिक वस्तूंची अतृप्त लालसा असते. हुंड्याच्या माध्यमातून अधिक संपत्ती, वस्तू किंवा रोख रक्कम मिळवण्याची त्यांची अपेक्षा असते. ही एक प्रकारची मानसिक विकृती असू शकते, जिथे त्यांना इतरांच्या भावनांपेक्षा स्वत:चा स्वार्थ महत्त्वाचा वाटतो. सामाजिक प्रतिष्ठा आणि तुलना याला आवास्तव महत्त्व काही कुटुंबात दिले जाते. समाजात काही ठिकाणी हुंडा घेणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. 'अमुक कुटुंबाला एवढा हुंडा मिळाला' अशा प्रकारच्या तुलनेतून आणि सामाजिक दबावातून हुंड्याची मागणी केली जाते. ही एक प्रकारची न्यूनगंड किंवा स्वत:ला श्रेष्ठ दाखवण्याची विकृत भावना असते.

पुरुषांचे वर्चस्व आणि महिलांना दुय्यम स्थान ही मानसिकता अशा घटनांना कारणीभूत ठरते. ज्या समाजात पुरुषांना श्रेष्ठ आणि महिलांना दुय्यम स्थान दिले जाते, तिथे हुंड्याची प्रथा अधिक घट्ट रुजलेली दिसते. मुलाला 'कमावता' आणि मुलीला 'खर्चिक' मानले जाते. त्यामुळे मुलीच्या कुटुंबाकडून तिच्या लग्नात 'भरपाई' म्हणून हुंडा मागितला जातो. ही एक लिंगभेदावर आधारित विकृत मानसिकता आहे. परंपरा आणि रूढींचे अंधानुकरण यातून आजही समाज बाहेर यायला तयार नाही. अनेक कुटुंबांमध्ये हुंडा देणे–घेणे हे परंपरेचा भाग मानले जाते. 'आमच्या कुटुंबात असेच चालत आले आहे' असे म्हणून याचे समर्थन केले जाते. यामागे कोणताही तर्क नसतो, आधार नसतो केवळ अंधानुकरण असते. सर्वात कहर म्हणजे मुलाच्या शिक्षणावर झालेला खर्च वसूल करण्याची वृत्ती देखील हुंडा मागण्यासाठी कारण ठरत आहे. काही पालक आपल्या मुलाच्या शिक्षणावर आणि संगोपनावर झालेल्या खर्चाची वसुली म्हणून हुंड्याची मागणी करतात. ही एक प्रकारची व्यापारी वृत्ती आहे, मुलावर जितके पैसे गुंतवले गेलेत त्यातून तो आजमितीला जे काही कामावतोय, जे आयुष्य, राहणीमान जपतोय त्यात त्याची पत्नी पण सहभागी होणार आहे तर तिला हे सर्व फुकटात का मिळावं? अशी मानसिकता अनेकांना हुंडा मागायला प्रवृत्त करते. या ठिकाणी मानवीय संबंधांपेक्षा आर्थिक व्यवहार महत्त्वाचा ठरतो.




हुंड्यासाठी मुलींना मानसिक आणि शारीरिक त्रास का दिला जातो? याचा विचार केल्यास लक्षात येते की, अपेक्षाभंग आणि निराशा. जेव्हा मनासारखा किंवा अपेक्षेप्रमाणे हुंडा मिळत नाही, तेव्हा काही कुटुंबे मुलीचा आणि तिच्या कुटुंबाचा छळ करण्यास सुरुवात करतात. त्यांच्या अपेक्षा पूर्ण न झाल्याने त्यांच्या मनात निराशा आणि राग निर्माण होतो, जो ते मुलीवर शारीरिक आणि मानसिक अत्याचार करून काढतात. वर्चस्व गाजवण्याची वृत्ती हा स्वभावातील दुर्गुण नव्या नवरीला त्रास द्यायला कारणीभूत असतो. सासरच्या मंडळींना नवीन आलेल्या सुनेवर आपले वर्चस्व गाजवायचे असते. हुंड्याच्या मागणीतून आणि त्यासाठी छळ करून ते तिला आपल्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा प्रयत्न करतात. सासरच्या लोकांच्या मनातील असुरक्षिततेची भावना हे देखील मुख्य कारण हुंडा मागण्यासाठी कारणीभूत असते. काही वेळा सासरच्या मंडळींमध्ये, विशेषतः सासू किंवा नणंदेमध्ये, नवीन सुनेबद्दल असुरक्षिततेची भावना असू शकते. आपल्या मुलाचे किंवा भावाचे प्रेम आणि लक्ष विभागले जाईल या भीतीने ते सुनेचा छळ करतात आणि हुंडा हे त्याचे एक निमित्त बनते. आता आलेली नवीन सून आपल्या मुलाला आपल्यापासून दूर करेल, त्याला वेगळं काढेल, तो आपल्याला विचारणार नाही असे अनेक गैरसमज मनात बाळगल्यामुळे सुनांना मानसिक त्रास दिला जातो. सामाजिक दबावाचे बळी ठरणारे कुटुंब, ज्यांना स्वतःची स्पष्ट मत अथवा स्वतंत्र विचार धारा आणि निर्णय घेण्याची ताकद नाही त्यांना समाजाच्या किंवा नातेवाइकांच्या दबावामुळे सासरची मंडळी हुंड्यासाठी तगादा लावतात किंवा छळ करतात, जरी त्यांची तशी मूळ इच्छा नसली तरी ते हुंडा घ्यायला द्यायला तयार होतात. हुंड्यामुळे होणाऱ्या त्रासातून विवाहित महिला आत्महत्या का करतात? यामागील मानसशास्त्रीय कारणे पाहिली तर लक्षात येते की, असह्यता आणि निराशा! सततचा शारीरिक आणि मानसिक छळ सहन केल्याने महिलेला प्रचंड असह्यता आणि निराशा येते. तिला असे वाटू लागते की या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग नाही. एकटेपणा आणि आधाराचा अभाव यामुळे जेव्हा महिलेला तिच्या माहेरच्यांकडून किंवा मित्र–मैत्रिणींकडून पुरेसा आधार मिळत नाही, तेव्हा ती अधिक एकटी पडते.

हुंडा ही एक अत्यंत गंभीर सामाजिक समस्या आहे, ज्यामुळे अनेक महिलांना शारीरिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते आणि काही वेळा त्यांना आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागते. या समस्येची मानसशास्त्रीय कारणे, आत्महत्येमागील कारणे आणि यावर काय उपाययोजना करता येतील, तसेच यासाठी कोणते कायदे अस्तित्वात आहेत, याची सविस्तर माहिती आपण या लेखात पाहणार आहोत.

# सत्तेचा माज आलेली सत्ताधारी नेते आणि कार्यकर्ते गुंड आहेत तात्काळ मुसक्या आवळा नसता बांगड्या भरा-डॉ.जितीन वंजारे

**बीड । प्रतिनिधी**

काल-परवा एक प्रकरण घडलं विधानभवनामध्ये दोन आमदारांची कार्यकर्ते एकमेकांसमोर लढली भिडली आणि हातपाय तोडफोड व डोके फोडा फोडी झाली. यादरम्यान सत्ताधारी पक्षाने विरोधातील पक्षाच्या आमदाराच्या कार्यकर्त्याला हणून मारून त्यांनाच जेलमध्ये टाकलं, त्या ठिकाणी विरोधातील असणाऱ्या काही प्रतिष्ठित आमदाराने पोलीस स्टेशनमध्ये जाऊन जोपर्यंत कार्यकर्त्यांना सोडवत नाही तोपर्यंत तेथेच थांबण्याचा पण केला आणि त्या ठिकाणी पोलिसांची आणि संबंधित प्रतिष्ठित आमदारांच्या बाचाबाच्या त्या ठिकाणी झाल्या परंतु दुसरे आमदार जे सत्तेमध्ये आहेत त्यांच्याच कार्यकर्त्यांनी विरोधकांच्या आमदाराच्या कार्यकर्त्याला हाणामाऱ्या करूनही त्यांच्यावर लवकर गुन्हा दाखल झाला नव्हता याचाच अर्थ पोलीस प्रशासन शासनाच्या अधीन आहे की काय?असा प्रश्न सामान्य जनतेच्या मनात निर्माण होत आहे. जेंव्हा एक प्रतिष्टीत राजकारणी आमदार तिथे गेले तेंव्हा गुन्हा दाखल झाला.हे घडतं की नाही की लगेच लातूर या ठिकाणी सत्ताधारी पक्षाचे आमदार रेस्ट हाऊस मध्ये आले असता सत्ताधारी पक्षाचे कृषिमंत्री प्ले रमी हा ऑनलाईन गेम मोबाईल वरती खेळत असतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला, ज्या ठिकाणी कायदे घडवले जातात, बदललले जातात आणि संविधान अबाधित ठेवण्याचे काम ज्या ठिकाणी केलं जातं, सामान्य जनमानसांच्या प्रश्नांना उत्तर ज्या ठिकाणाहून दिली जातात, लोकप्रतिनिधींना निवडून दिल्यानंतर त्या ठिकाणी आपल्या सामान्यांच्या प्रश्नासाठी आवाज उठवायचा सोडून येथील कृषिमंत्री रमी हा पत्त्याचा मोबाईल वरती गेम खेळत होते हे किती लज्जास्पद आहे. एकीकडे शेतकरी हवालदिल आहे पाऊस नाही पाणी नाही कर्जमाफी देत नाहीत आणि ते सोडून कृषिमंत्री प्ले रमी गेम खेळत असतील तर धन्य ते सरकार धन्य ते मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री आणि त्यांचं बेजबाबदार मंत्रिमंडळ. धिक्कार असो तुमचा.सामान्य कुटुंबातील शेतकऱ्याच्या पुत्राला हे सहन झालं नाही म्हणून छावाचे प्रदेशाध्यक्ष सन्माननीय घाडगे पाटील यांनी त्यांच्या सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना पत्ते भेट देऊन या कृषी मंत्र्याचा जाहीर निषेध व्यक्त केला. हा मनामध्ये राग ठेवून सत्ताधारी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी एक नव्हे तर तब्बल २० ते ३० जणांनी बेदम अशा पद्धतीने घाडगेपाटील यांना व साथीदाराणा बेदम मारलं. यावरून एक प्रश्न निर्माण होत आहे महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठा माणूस व जे बोलतात तेच करतात असं ज्यांची ओळख



आहे असे सन्माननीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्या कार्यकर्त्यांनी असं अशोभनीय कार्य करणे म्हणजे लज्जास्पद आहे,२० ते ३० लोकांच्या जमावाने एकट्या माणसाला मारणं तेही वाईट कृत्य केलेल्या आमदाराविषयी बोलल्यामुळे हे कितपत योग्य आहे संबंधित पदाधिकाऱ्यांचे राजीनामे घेऊन तात्काळ त्यांना योग्य ती कार्यवाहि करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मा. सम्राट डॉ. जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी केली आहे. पोलीस प्रशासनाने हा सगळा तमाशा बघूनही संबंधित आरोपींवरती कार्यवाही तात्काळ का केली नाही? हा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मनामध्ये असलेला प्रश्न आहे मग अशा पद्धतीने सत्ताधारी विरोधात खरं बोललं की तुम्ही हाणामाऱ्या करणार आहात का? तुम्ही कसाही वागलात तरी यावर सामान्य जनतेने बोलायचंच नाही का? शेतकऱ्याचे प्रश्न तुम्ही सभागृहांमध्ये मांडण्याचे ऐवजी प्ले रमेश सारखे गेम खेळून शेतकऱ्यांना उद्धट भाषा वापरणार आहात का? कर्जमाफी द्यायची सोडून प्ले रमी खेळणार आहात का? सत्ताधारी पक्षाचा आरसा हा सामान्य जनता असते त्यांच्या वेळोवेळी झालेल्या चुकीला तात्काळ दुरुस्त करण्याचे काम विरोधी पक्ष, पत्रकार, राजकीय अभ्यासक आणि येथील जनता करत असते मग लोकशाहीची ही शुद्ध प्रक्रिया तुम्ही बिघडवणार आहात का? सन्माननीय अजितदादा पवार साहेब तुमच्या पक्षाचा कार्यकर्ता इतक्या असभ्यतेचे वर्णन वर्तन करेल असं कोणालाही वाटत नाही, तुमची तुमच्या पक्षातील कार्यकर्त्यांवरची जरब कमी झाली आहे की काय? सत्तेच्या विरोधात कोणीही बोलला तरी त्याला अशाच पद्धतीने हाणून मारून दबावशाही, दडपशाही वापरून तुम्ही सामान्य जनमानसांच्या मनातील भावना दडपून टाकणार आहात का ? दहशद निर्माण करणार आहात का?पोलीस प्रशासनाचा वापर लोकांची दडपशाही करण्यासाठी करणार आहात का? असे एक ना अनेक सभाल सध्या सामान्य माणसांच्या मनामध्ये येत आहेत सत्ताधारी पुरोगामी योग्य राजकारणी म्हणून अजितदादा पवार यांच्याकडे पाहिलं जातं त्यामुळे भाविकाळामध्ये संबंधित कार्यकर्त्यांवर काय कार्यवाही होईल याकडे सर्व महाराष्ट्राचे लक्ष लागून आहे.आमच्या बीडचे पालकमंत्री असणारे सन्माननीय अजितदादा पवार हे पुरोगामी नेते आहेत आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या कुशल राजकीय दृष्टीमध्ये घडलेले नेतृत्व आहे मग असा असंस्कृतपणा महाराष्ट्राला दाखवणाऱ्या कार्यकर्त्यांवर किती लवकर कार्यवाही करतील हेच पाहण्याजोग आहे. तूर्तास महाराष्ट्राच्या राजकारणाचा तमाशा ह्याच सत्ताधाऱ्यांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी केल्याचं पाहावायला मिळत आहे. हे वेळीच थांबवा सुसंकृत महाराष्ट्राच्या राजकारणाचा स्थर बिघडत चालला आहे तो सुधारा असा सल्ला यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी दिला आहे.

## खड्डा झाला पालकमंत्री तर बाकी खड्डे पालकमंत्र्याची पिलावळं

# नवं पर्वाची थीम घेऊन मिरवणाऱ्यांना बारामती दाखवा-उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर मरणयातना भोगत आहे. उघडे रोहित्र, उघड्या नाल्या, सर्वत्र खड्डे, कचऱ्याचे ढिगारे, शहरवासियांच्या पिण्याच्या पाण्याचं नियोजन या सारख्या शेकडो समस्या म्हणजे शहरवासियासाठी मरणयातनाचं, पालकमंत्री म्हणून अजितदादा पवार आपण लक्ष घाला, बारामती जशी महाराष्ट्रासाठी आयडॉल आहे तसे बीड करा, बीड मध्ये नवं पर्वाची थीम घेऊन मिरवणाऱ्यानां आपली बारामती दाखवा. दादा आपणाकडुन शहरवासियांच्या खुप अपेक्षा आहेत याला तडा जाऊ देऊ नका. आज शिवसैनिकांनी एका खड्ड्याचे नमकरण पालकमंत्री केले तर बाकी खड्डे पालकमंत्र्याची लाभार्थी पिलावळं असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

आज बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस या मार्गांवर असणाऱ्या खड्डया संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आंदोलन निदर्शने करण्यात आली.



या मार्गांवरील मुख्य खड्ड्याला पालकमंत्री खड्डा असे नाव देऊन खड्ड्याचे नामकरण करण्यात आले, तर बाकी छोटी - मोठी खड्डे पालकमंत्र्याची लाभार्थी पिलावळे असल्याचे शिवसैनिकांनी जाहीर केले. खड्ड्यात पालकमंत्र्याची प्रतिमा ठेऊन गुलाल बुक्का व हार घालून, ढोल तशे वाजवून जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी लक्षावेधी आंदोनल केले.

बीड शहरातील प्रमुख रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस हा होय, या मार्गांवर आज शेकडो खड्डे आहेत. या मार्गांवर नगर पालिका आहे, जिल्हा परिषद आहे. याच मार्गे विध्यार्थी शाळा- महाविद्यालयात जातात, जिल्हा रुग्णालयात नागरिक जातात, ग्रामीण भागातील शेतकरी आपला भाजीपाला घेऊन याच मार्गे बाजारपेठेत जातात, स्थानिक व्यापारी याच मार्गांवर आपले व्यवसाय करतात. अजितदादा आपण पालकमंत्री आहात, आपण एकदा शहरात फिरून सर्वे करावा म्हणजे शहरवासीयांच्या समस्या लक्षात येतील. आपणा पुढे नवपर्वांची थीम घेऊन मिरवणाऱ्या पिलावळीनां थोडी समाज द्या, त्यांना आपली बारामती फिरून दाखवा, बीड ची भानामती होऊ देऊन नका असे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.यावेळीमहिला संघटिका मीराताई नवले ,उपजिल्हाप्रमुख संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले, रतन तात्या गुजर, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे,नवनाथ प्रभाळे, थिगळे विशाल , गणेश लोणकर,विनोद गोरख,जगदीश गिराम,प्रदीप कोटुळे, सतीश सिंह परदेशी, शरद पवार, दिलीप पवार , मच्छिंद्र काळे,चंदूनाना कागदे, प्रेम ताकतोडे, बळी कोटुळे, विशाल तांबे आदी शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लि.मार्फत एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २१ जुलै २०२५ रोजी यशवंतरावचव्हाण इन्स्टिटयूट ऑफ पॉली टेक्निक बीड येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच सेंट्रलडिपॉझिटरी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड (सी.डी.एस.एल.) मार्फत एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम पॉलिटेक्निक द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी.जी.मारलापल्ले सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच सी.डी.एस.एल. चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना सेबी तसेच सी डी एस एल ची कार्य प्रणाली विषद केली तसेच बचत व बचतीचे महत्त्व समजावून सांगितले.राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या विविध योजना,डिमॅट अकाउंट,शेअर मार्केट, म्युच्युअल फंड व इतर शासकीय योजनांचे मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी अकॅडमी को-ऑर्डिनेटर बी.ए केंद्रे सर,सर्व विभाग प्रमुख आय एल मोमीन सर,श्री.धसे जी.एन सर,श्री.सोळंके ए.एस सर,श्री.पांडे सी.डी सर, श्रीमती मोरे डी.एन मॅडम,श्री.जे.व्ही देशमुख सर तसेच प्राध्यापक शेख एफ.जे सर,श्री.राऊत डी.बी सर,श्री.धुमाळ बी.आर सर,श्री.खूरुद एस.पी सर यांनी विशेष परिश्रम घेतकार्यक्रमाचे आयोजन,नियोजन तसेच सूत्रसंचालन केले.या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजपाल काकडे यांची भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चा मंडळ अध्यक्षपदी निवड



**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात युवकांची मोठी फळी निर्माण करणारे युवा नेते राजपाल भैया काकडे यांची भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चा मंडळ अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.

पर्यावरण मंत्री महाराष्ट्र राज्य ना.पंकजाताई मुंडे,मा.खासदार प्रितमताई मुंडे,केज मतदार संघाच्या आमदार नमिताताई अक्षय मुंदडा,राज्य परिषद सदस्य अक्षय मुंदडा,जेष्ठ सामाजिक नेते नंदकिशोरजी (काकाजी) मुंदडा, तालुकाध्यक्ष भगवान केदार यांच्या आदेशाने युवा नेते राजपाल भैया काकडे यांची भाजप च्या युवा मोर्चा मंडळ अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या निवडीबद्दल राजकीय,सामाजिक तसेच मित्र परिवारा कडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## अंबाजोगाई येथे शंभर निराधारांना किराणा साहित्याचे वाटप

# दानशुर व्यक्तींच्या अर्थ सहाय्यातून मानवलोक चा स्तुत्य उपक्रम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दानशुरांच्या अर्थ सहाय्यातुन ऐंशी वृध्द निराधारांना मान्यवरांच्या हस्ते किराणा किट वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नागझरीचेसरपंच प्रशांत दहिफळे,पत्रकार राहूल देशपांडे,रामकृष्ण गो शाळेचे संचालक संतोष गिरी,अरुण आसरडोह कर आदी उपस्थित होते.प्रशांत दहिफळे म्हणाले की,हाल अपेष्टात जीवन जगत असताना अनेक संकटांशी सामना करावा लागतो. प्रामुख्याने रोजी रोटीचा प्रश्न गंभीर असून याच प्रश्नासाठी मानवलोक संस्थेच्या माध्यमातून समाजातील दानशुर व्यक्ति मदत करतात



राहूल देशपांडे म्हणाले की,दानशुरांनी केलेल्या मदतीच्या माध्यमातून सर्वांना महिन्याला किराणा साहित्य वाटप होते आणि त्यांच्यारोजी रोटीचा प्रश्न सुटतो.

दानशूर व्यक्तींच्या अर्थ सहाय्यातुन वृध्द, दिव्यांग,अंध,निराधार आजारग्रस्त उपेक्षितां साठी मानवलोक सेवाभावी संस्था कार्य करत असल्याचे आपल्या प्रास्तविकातून शाम सरवदे यांनी सांगितले.सुरुवातीला संजना आपेट,सावित्री सागरे यांनी स्वागत गीत म्हटले.मानवलोकच्या या स्तुत्य उपक्रमाचे स्वागत होत असुन लाभार्थी व्यक्तींनी आभार मानले आहेत.

# देगलूर तालुक्यात पावसाने महिण्या पासून दडी मारल्याने शेतकरी चिंताग्रस्त

**देगलूर । प्रतिनिधी**

देगलूर तालुक्यात खरिपाच्या पेरणीनंतर मागील १५ ते २० दिवसापासून पावसाने दडी मारली आहे. पंधरा ते वीस दिवसापासून दररोज सोसाट्याचा वारा सुटल्यामुळे जमा झालेले ढग पुढे सरकत आहेत. बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत आहे.यावर्षी नक्षत्रापासूनच पाऊस सुरू झाल्यामुळे काही शेतकऱ्यांनी लवकर पेरणी केली तर काही शेतकऱ्यांच्या पेरणीपूर्व मशागती तयार नसल्यामुळे उशिरा पेरणी करण्यात आली आहे. १५ ते २० दिवसापासून पावसाने दडी मारल्यामुळे उन्हाचा पारा चढला आहे कोवळी पिके कोमेजून जात असून शेतकऱ्यांना पावसाची प्रतिक्षा लागून राहिली आहे. देगलूर तालुक्यातील तमलूर, सांगवी (उमर), शहापूर, खानापूर, करडखेड, मरखेल, हाणेगाव, माळेगांव (म.), बेंबरा, मानूर, भुतनहिप्परगा, तडखेल, या परिसरातील शेतकऱ्यांनी एकूण लागवडी योग्य क्षेत्राच्या ७० ते ७५ टक्के क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी केली असून, उर्वरीत शेतकऱ्यांनी उडीद, मुग, तुर, कापूस इतर पिकांची पेरणी केली आहे. जमिनीमध्ये ओलावा असला तरी मध्यम व हलक्या प्रतीच्या जमिनीत असलेल्या खरीप पिकासाठी पावसाची नितांत गरज आहे. पिके कोलमडून जात आहेत. ढगाळ वातावरणामुळे अंधार मय व आकाशात पावसाचे दररोज ढग जमा होत असताना दिसून येते पण वारा सुटल्यामुळे ढग पुढे पुढेच सरकत आहेत. त्यामुळे चिंताग्रस्त शेतकऱ्यांनी अंतरमशागतीची लगबग सुरू केली आहे.सुर्याचा पुनर्वसू नक्षत्र संपुष्टात आला असून या नक्षत्रात पाण्याचा एकही थेंब पडला नाही. शेतकऱ्यांच्या शेतातील पिके सुकून जात आहेत या वर्षी पावसा अभावी खरीप पिकांचे उत्पन्न घटणार की काय? अशी चिंता बळीराजाला सतावत आहे.सुर्याचा पुष्य नक्षत्राच्या आगमन काळात पाऊस वेळेत नाही पडल्यास पेरणी केलेल्या पिकांची वाढ होणे शक्य तर सोडाच पण वाळून जाण्याची दाट शक्यता आहे. शेतकऱ्यांनी जुन महिन्याच्या मोसमात बियाणाची पेरणी करण्यासाठी उसनवारी, व्याजाने पैसे काढून हजारो रुपयांचे बियाणे खरेदी करून पेरणी केलेली आहे. पावसाने ऐन हंगामात दडी मारल्याने हातचे ही गेले, अन् पदरचे ही गेले अशी प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेतात बोअर किंवा विहिरी असलेल्या शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन द्वारे कोवळ्या पिकांना थेंबा थेंबाने पाणी पाजवत आहेत तर काही शेतकऱ्यांच्या शेतात विहीर आहेत पण त्या विहिरीत थोडेसे पाणी असून विजेचा भरोसा नाही. बळीराजाने जीवाची पर्वा न करता दिवस रात्र एक करून पिकांची सेवा करत आहेत.पशुधनाची घटलेली संख्या लक्षात घेता अनेक शेतकरी ट्रॅक्टरच्या साह्याने पेरणी व मशागतीची कामे केली व करीत आहेत.

# प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेच्यावतीने गौरव सोहळ्याचे आयोजन; जनतेकडून मनःपूर्वक मानवंदना

## बौद्ध समाजासाठी स्वतंत्र अधिकार व संरक्षणाची गरज-पू.भदंत डॉ.उपगुप्त महाथेरो

**बीड । प्रतिनिधी**

बौद्ध समाजाच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांसाठी केंद्र शासनाने ठोस धोरणात्मक निर्णय घ्यावेत, बुद्धगया महाविहार बिहार स्वतंत्रपणे बौद्ध धर्मियांच्या ताब्यात असावा आणि देशातील बौद्ध स्थळांचे व्यवस्थापन बौद्ध समितीकडे सोपवले जावे, अशी स्पष्ट मागणी अखिल भारतीय भिक्खू संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष पू. भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी बीड येथे बोलताना केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने गौरव महाराष्ट्राचा या राज्य शासनाच्या उपक्रमांतर्गत १० जून २०२५ रोजी मुंबई येथे पू. महाथेरो यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या या सन्मानाच्या निमित्ताने, प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था आणि बीड शहरातील नागरिकांतर्फे भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन शनिवार, दिनांक १९ जुलै रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



संभाजीनगरचे अभियंता आयु. बी.के.आदमाने होते. तर, प्रमुख अतिथी म्हणून प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेचे सचिव, पू.भिक्खू धम्मशील थेरो, पू.भिक्खू पय्याथीस, बीड जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयु.पी.व्ही.बनसोडे, मेटा संघटनेचे राज्याध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, सत्यशोधक ओबीसी परिषदेचे राज्याध्यक्ष आयु. संदीप उपरे, सनदी लेखापाल आयु. बी.बी. जाधव उपस्थित होते. यावेळी पू.महाथेरो यांना पुष्पगुच्छ, हार, चीवर व बुद्धमूर्ती देऊन सन्मानित करण्यात आले.पुढे पू.भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो म्हणाले, हा सन्मान माझ्यासाठी नसून, धम्माच्या कार्यात तन-मनाने समर्पित असलेल्या प्रत्येकासाठी आहे. मी हा गौरव धम्म, समाज आणि शिक्षणाला समर्पित करतो. त्यांनी देशातील बौद्ध स्थळांच्या संरक्षणात पुरातत्व खात्याची भूमिका उदासीन असल्याचे सांगून तीव्र नाराजी व्यक्त केली, यासाठी कायदेशीर लढाई लढण्याची वेळ आली असल्याचेही त्यांनी ठामपणे नमूद केले.

मुख्य संयोजक पू.भिक्खू धम्मशील थेरो यांनी उपस्थित धम्मप्रेमी आणि उपासक-उपासिकांचे आभार मानताना पू. महाथेरो यांच्या कार्याची स्तुती केली. गुरु म्हणजे मार्गदर्शक, प्रेरणास्त्रोत आणि ज्ञानाचा अथांग सागर. संघर्ष, सातत्य आणि संयम या त्रिसूत्रीच्या आधारावर डॉ.महाथेरो यांनी आपले जीवन घडवले. गेली ५५ वर्षे ते समाजाला दिशा देत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक शिष्य घडले. अशा थोर गुरूंचा लाभ हीच आमची खरी संपत्ती आहे, असे भावनिक उद्गार त्यांनी काढले.उपस्थित मान्यवरांनी पू. महाथेरो यांचे कार्य हे नव्या पिढीसाठी दीपस्तंभ ठरेल, असा गौरवोद्गार काढला. त्यांचा सन्मान म्हणजे समस्त धम्मप्रेमींसाठी ऊर्जा आणि प्रेरणादायी प्रसंग ठरल्याचे मत बी.के.आदमाने यांनी मांडले. कार्यक्रमाला प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, उपासक-उपासिका, विद्यार्थी, शिक्षक, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरकुल धारकांना धनादेश वाटप करा,अन्यथा बीड न.प. ला टाळे ठोकू-अशोक वीर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील घरकुल धारकांना दोन ते तीन दिवसात घरकुलाचे धनादेश न मिळाल्यास न.प. ला टाळे ठोकणार, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भावनाचे प्रणेते तथा बहिरवाडी चे माजी अशोक वीर यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात सांगितले आहे. मार्च महिन्यात नवीन घरकुल साठी फंडा आला आहे, ३ ते ४ महिने झाले घरकुलाची यादी मंजुर व प्रसिध्द करुन, फलकावर लावण्यात आलेली आहे. बजेट पण आहे तरी पण ऐन पावसाळ्यात घरकुल धारकांनी घराचे बांधकामे



सुरु केलेले आहेत. परंतु न.प.सिओ यांना सध्या सह्या करायला वेळ नाही म्हणुन बीड शहरातील घरकुल धारक न.प. मध्ये चकरा मारुन मारुन मेटाफुटीला आलेले आहेत. सि.ओ.अंधारे मॅडम यांनी दोन ते तीन दिवसात सह्या करुन धनादेश घरकुल धारकांना वाटप नाही केल्यास सर्व घरकुल धारकांना सोबत घेवुन न.प. बीडला टाळे ठोकण्यात येईल. काही अनुचीत प्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील याची नोंद घ्यावी. अशा स्वरूपाचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी यांना अशोक वीर यांनी दिले आहे.

# वंचित बहुजन आघाडी व युवा आघाडीच्या संयुक्त संपर्क कार्यालयाचे परळीत उद्घाटन

## या कार्यालयातून वंचित,शोषित,पीडित,उपेक्षितांना न्याय मिळेल-शैलेश कांबळे

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरात वंचित बहुजन आघाडी व युवा आघाडीच्या संयुक्त संपर्क कार्यालयाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात पार पडले. सामाजिक न्यायाच्या दिशेने भक्कम पावले टाकण्यासाठी हे कार्यालय कार्यकर्त्यांसाठी एक प्रेरणास्थान ठरणार आहे. उद्घाटनाचा मान वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे व जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या हस्ते झाला. शैलेश कांबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की,प्रत्येक पदाधिकाऱ्याने




वंचित घटकांच्या सुखदुःखात सहभागी व्हावे आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ताकदीने उतरून वंचित समाजाला प्रतिनिधित्व मिळवून द्यावे.उपस्थित मान्यवर सचिन उजगरे - उपाध्यक्ष, बीड जिल्हा,अजय सरवदे - जिल्हाध्यक्ष, बीड पश्चिम,खंडू जाधव - महासचिव, बीड पश्चिम,प्रसन्नजीत रोडे - उपाध्यक्ष, बीड पूर्व,संजय नाकलगावकर - माजी तालुकाध्यक्ष, माजलगाव,लखन काका जोगदंड ,हनुमंत वाघमारे - अध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा, परळी कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन गौतम साळवे (तालुकाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी - परळी) यांनी केले, तर आभार प्रदर्शन राजेश सरवदे (तालुकाध्यक्ष, वंचित बहुजन युवा आघाडी - परळी) यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमास परिसरातील नागरिक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला पाठिंबा दर्शवला.

## बीडमध्ये शिवसेनेची आढावा बैठक संपन्न!

# पूर्ण नियोजन आणि परफेक्ट कार्यक्रम करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत शिवसेनेचा भगवा फडकवा-मोरे

**बीड । प्रतिनिधी**

तळागाळातील माणसांची जाणीव असणारे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब स्व कर्तृतवाने घरघरात पोहचले. सन्माननीय शिंदे साहेब पूर्ण ताकदीने आपल्या सोबत आहेत. यामुळे आता थांबायचे नाही तर पूर्ण नियोजन आणि परफेक्ट कार्यक्रम या सूत्रनुसार आपल्याला शहर-ग्रामीण भागात शिवसेनेचे संघटन मजबूत करायचे आहे आणि शिवसेनेचा बालेकिल्ला हा बीड जिल्हाच आहे, हे दाखवून द्यायचं आहे. यामुळे पूर्ण ताकदीने कामाला लागा, स्वतःला सिद्ध करा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात भगवा फडकवा असे आवाहन शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांनी केले.

शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब आणि खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि उपनेते अर्जुन खोतकर आणि सचिव संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारपासून सलग तीन दिवस बीड जिल्ह्यात विधानसभा निहाय



बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. परळी, गेवराई, केज, माजलगाव विधानसभा मतदार संघ तसेच वडवणी येथे आढावा बैठक पार पडल्यानंतर काल दि. २१ जुलै रोजी दु. १.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यलय येथे अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आढावा बैठक पार पडली. या बैठकीत शिवसेनेची रणनीती, ताकद आणि संघटना या तिन्ही घटकांच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकीत यश मिळवण्यासाठी नियोजन करण्यात आले. पक्ष व संघटना आणखी बळकट करण्याच्या दृष्टीने अचूक नियोजन व त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी यंदा शिवसेनेचा भगवा स्थानिक स्वराज्य संस्थांवर फडकवण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, शिवसेना महिला आघाडी, युवासेना, शेतकरीसेना, ओबीसी व्हिजेएन्टीसेना, एसटी कामगार सेनेचे आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी, सरपंच तथा शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेनेच्या यशस्वीरित्या पार पडलेल्या बैठकीचे सूत्रसंचलन प्रास्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले.

### अनिलदादांनी रंगशिंग फुंकले!

**हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या संस्कार आशीर्वादांचे तेज, महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांचे सहकार्य ताकद व तमाम शिवसैनिकांच्या साथीने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढवणार असून संपूर्ण बीड जिल्हा भगवामय करणार असल्याचे सांगत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले आहे.**

# प्रतीक्षा शिंदे यांची भाजपाच्या तालुका उपाध्यक्ष पदी निवड



**केज । प्रतिनिधी**

चिंचोलीमाळी येथील प्रतीक्षा दीपक शिंदे यांचा अनुभव व पक्ष कार्यातील तळमळ याची दखल घेऊन त्यांची भारतीय जनता पार्टी केज पश्चिम मंडळाच्या उपाध्यक्ष पदी तालुका अध्यक्ष संदीप पाटील यांनी निवड केली आहे. भाजपाच्या ध्येय धोरणाला अनुसरून पक्ष कार्य व पक्षाचे विचार तळागाळात पोहोचवण्यासाठी तसेच लोकनेत्या ना.पंकजा ताई मुंडे व माजी खा. डॉ.प्रितमताई मुंडे व आमदार नमिताताई मुंदडा,भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांचे हात बळकट करण्यासाठी पक्षाने आपल्यावर जी जबाबदारी सोपवली आहे,ती आपण जिम्मेदारीने पार पाडू असा विश्वास प्रतीक्षा दीपक शिंदे यांनी यावेळी दिला.या निवडीचे भाजपाचे जेष्ठ नेते सुनिलआबा गलांडे, दगडू दळवे,दिलीप गायकवाड,चेअरमन अरुण काळे,व्हाईस चेअरमन आबासाहेब केदार,उपसरपंच धीरज वनवे यांनी या निवडीचे स्वागत केले आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलसाठी पात्र गरजू लाभार्थींनी सेल्फ सर्व्हे पूर्ण करून घ्यावा-संजय मुंडे

## प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ सर्व्हेक्षणसाठी ३१ जुलै २०२५ पर्यंत मुदतवाढ

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील घरकुलसाठी पात्र गरजू लाभार्थींनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलसाठी लागणारा सेल्फ सर्व्हे पूर्ण करून घ्यावा असे आवाहन भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय मुंडे यांनी केले आहे. यासाठी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ सर्व्हेक्षणसाठी ३१ जुलै २०२५ पर्यंत मुदतवाढ देणात आली आहे. तरी गरजू व पात्र असलेल्या लाभार्थ्यांनी घरकुलासाठी स्वतः पवरून आपला सर्वे पूर्ण करून घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून त्याकरिता ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करण्यासाठी ३१ जुलै अंतिम मुदतवाढ मिळाली आहे. ३१ जुलै पर्यंत नागरिकांना मोबाईल पद्वारे सेल्फ सर्व्हे करता येणार आहे. सर्वे पूर्ण करण्याची मुदत संपणार असून त्याआधी पात्र असलेल्या गरजू नागरिकांनी आपल्या घरकुलांचे सर्वेक्षण पूर्ण करून घ्यावे. नव्या मुदतवाढीमुळे अधिकाधिक पात्र कुटुंबांना याचा लाभ घावा असे आवाहन केले आहे. ज्या नागरिकांचे सेल्फ सर्व्हे करणे बाकी आहे अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत ३१ जुलै पर्यंत सेल्फ सर्व्हे करावा.सर्वेक्षण प्रक्रिया सुलभ आणि सर्वसमावेशक व्हावी यासाठी प्रशासनाने दोन पद्धती उपलब्ध करून दिल्या आहेत: स्व-सर्वेक्षण आणि सहाय्यित सर्वेक्षण. लाभार्थी स्वतः https://pmayg.nic.in/netiay/Home/home.aspx या संकेतस्थळावर किंवा आवास प्लस २०२४ मोबाइल ॲपद्वारे सर्वेक्षण करू शकतात. याशिवाय, ग्रामपंचायत अधिकारी आणि अधिकृत सर्वेक्षक त्यांच्या आधार क्रमांकाने लॉगिन करून पात्र कुटुंबांचे सर्वेक्षण करतील. लाभार्थ्यांनी सर्वेक्षण करताना अचूक माहिती भरणे आवश्यक आहे. तरी तालुक्यातील नागरिकांनी घरकुलसाठी पात्र गरजू लाभार्थींनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलसाठी लागणारा सेल्फ सर्व्हे पूर्ण करून घ्यावा असे आवाहन भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय मुंडे यांनी केले आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077